MHPU250010222019

## फौ.चौ.अर्ज क्र.२५१/२०१९ मधील निशाणी ५ वरील आदेश

१) सदरचा अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण करणारा अधिनियमाच्या तरतूदी नुसार अंतरिम आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जदाराचा मूळ अर्ज प्रलंबित आहे.

२) अर्जदाराने मूळ अर्ज महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण करणारा अधिनियमाच्या कलम १२ प्रमाणे दाखल केला आहे व त्यामध्ये कलम १८, १९, २०, २१, २२ व २३ प्रमाणे आदेशांची मागणी केली आहे.

३) सदरच्या अर्जात अर्जदाराचे कथन आहे की, तिचा विवाह सामनेवाला क्र. १ याच्यासोबत २०.०५.२०१३ रोजी झाला असुन त्यांचेतील विवाहसंबंध अद्याप कायम आहे. तसेच अर्जदारास सदर लग्नसंबंधातून काहीएक आपत्य झालेले नाही. लग्नानंतर अर्जदार सामनेवाला क्र. १ कडे नांदायला गेली. त्यावेळी सामनेवाले यांनी तिला सुरुवातीचे दोन ते तीन महिने व्यवस्थित नांदवले परंतु त्यानंतर सामनेवाला क्र. १ ते ५ हे काहीही कारण तिला मारहाण करत होते. सामनेवाला क्र. १ हा दारुच्या अंमलाखाली अर्जदारास मारहाण करीत होता. तसेच तिचे चारित्र्यावर संशय घेवून तिला शिवीगाळ करणे, उपाशी ठेवणे, घराबाहेर काढणे, माहेरहून पैसे घेवून ये अशी मागणी करत असे. अर्जदार सामनेवाला यांचा सर्व त्रास सहन करुन संसार वाचविण्याकरीता सासरी नांदत होती. मात्र सामनेवाला क्र. १ हा घर खर्चाला पैसे न देता स्वत: मौज मजा करुन अर्जदारास त्रास देत असे.

४) त्यानंतर अर्जदाराचे अर्जातील कथनानुसार दि.११.१०.२०१३ रोजी पुन्हा सामनेवाला क्र. १ याने दारुच्या अमंलाखाली अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला मारहाण करुन घराबाहेर काढले. त्यावेळी अर्जदाराचे माहेरच्या लोकांनी मध्यस्थीमार्फत प्रयत्न करुन अर्जदारास पुन्हा नांदण्यास पाठविले. मात्र सामनेवाला यांचे वागणुकीत कोणताही बदल झाला नाही. त्यानंतरही दि. १५.१२.२०१३ रोजी सामनेवाला क्र. १ याने दारुच्या नशेत अर्जदारास शिवीगाळ व मारहाण केली. सामनेवाला क्र. १ यास सामनेवाला क्र. २ ते ५ यांची मदत आहे. त्यानंतर अर्जदार हिने सामनेवाला यास महिलामंडळ जुन्नर यांचेतर्फे नांदविण्यास घेवून जाण्याकरीता पत्र पाठविले मात्र सामनेवाला यांनी अर्जदार हिला नांदवण्यास नकार दिला. तेव्हापासून अर्जदार नाईलाजाने तिच्या माहेरी राहत आहे. अशाप्रकारे सामनेवालाने अर्जदारावर घरगुती हिंसाचार केला आहे. तसेच अर्जदाराच्या पालनपोषणाची जबाबदारी सामनेवाला क्र. १ टाळीत आहे. सामनेवाला यास मौजे देवळे (चिंचेचीवाडी), ता. जुन्नर, जि. पुणे येथे उत्कृष्ट प्रतिची दोन एकर शेतजमीन असून त्यातील तांदळाच्या पिकापासून वर्षाकाठी तीन ते चार लाख रुपये एवढे उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला क्र. १ याची स्वत:च्या मालकीची जिपगाडी असून त्याला मोठया प्रमाणात कमिशन मिळते. त्यामुळे सामनेवाला यांची परिस्थिती ही सधन आहे. सामनेवाला हे अर्जदाराची विचारपुस करत नसून तिचे अन्न, वस्त्र व औषधपाण्याची देखील सोय करीत नाही. यावरुन अर्जदाराने मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत सामनेवालाने अर्जदार हिला दरमहा रुपये १५,०००/— अंतरिम पोटगी दयावी अशी मागणी केली आहे.

५) सामनेवाला यांनी निशाणी ०८ प्रमाणे त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी नातेसंबंध मान्य करुन इतर मजकुर नाकारलेला आहे. सा.वाला यांनी असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार ही

सामनेवाला यांच्याकडे मु.पो. देवळे, ता. जुन्नर, जि. पुणे येथे नांदण्यास आली असता तिने सामनेवाला क्र. १ यांचेसोबत सुरुवातीचे एक–दोन महिने व्यवस्थित संसार केला. त्यानंतर सामनेवाला क्र. १ यांच्याशी भांडण, शिवीगाळ करुन उलटसुलट उत्तरे देण्यास सुरुवात केली. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला क्र. १ यांचेसोबत त्यांचे आईवडिलांपासून वेगळे राहू लागली परंतु तरी देखील अर्जदार हिच्या स्वभावात कोणताही फरक झाला नाही. सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या आईवडिलांना त्याबाबत सांगितले परंतु ते अर्जदारास काहीएक बोलत नव्हते. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ याचेपासून वेगळा राहण्याचा प्रयत्न करत असे. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ याचेशी व्यवस्थित संसार करत नव्हती. दि.०२.०३.२०१४ रोजी अर्जदार ही दागदागिने, कपडेलत्ते व आवश्यक त्या सर्व वस्तु घेवून सामनेवाला क्र. १ याचे घर सोडून निघून गेली. अर्जदार ही आजतागायत तिच्या माहेरी आईवडिलांकडे व दिघी येथील भारत माता नगर येथे भाडयाने खोली घेवून सुखी व आनंदाने राहत आहे. त्यामुळे सामनेवाला यांनी तंटामुक्ती कमिटी देवळे, तंटामुक्ती कमिटी अंजनावळे, पोलिस पाटील, सरपंच व गावातील प्रतिष्ठीत व्यक्तीमार्फत अर्जदार हिला नांदण्यास आणण्याचे प्रयत्न केले परंतु अर्जदार हिने नांदण्यास नकार दिला.

६) पुढे सामनेवाला यांचे म्हणण्यानुसार अर्जदार ही भोसरी एमआयडीसी येथे नोकरी करुन दिघी येथील भारतमाता नगर येथे भाडयाने रुम घेवून राहत आहे. तिला सदर कंपनीतून १५ ते १६ हजार पगार मिळतो. ती स्वतःचा उदरनिर्वाह करीत आहे. तिचे बारावी पर्यंत शिक्षण झालेले असून तिला एमएससीआयटी कोर्स झालेला आहे. त्यामुळे ती नोकरी करुन तिचा उदरनिर्वाह करु शकते. अर्जदार हिचेवर इतर कोणाचीही जबाबदारी नाही. सामनेवाला क्र. १ याची अर्जदार हिचेसोबत संसार करण्याची प्रामाणिक इच्छा असून अर्जदाराच्या अचानक निघून जाण्याने सामनेवाला

क्र. १ याला शारिरीक व मानसिक त्रास झाला असून अर्जदार पोटगी करता खोटा अर्ज देवून पुन्हा सामनेवाला यांना त्रास देत असल्याने अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

७) अर्जदार यांच्यातर्फे झालेला युक्तिवाद ऐकला. अर्जातील दाखल कागदपत्रे वाचली. सामनेवाला यांना युक्तीवादाकरीता वारंवार संधी देवूनही सामनेवाला न्यायालयात हजर राहिले नाही अथवा युक्तीवाद केलेला नाही. सबब, सदरचा अर्ज सामनेवाला यांचे युक्तीवादाशिवाय चालविण्यात आला.

८) अर्जदाराने अर्जातील कथनाच्या पृष्ठयर्थ शपथपत्र दाखल केले आहे. त्यावरून असे दिसते की, अर्जदाराने सदरच्या अर्जाव्दारे केलेल्या मागण्या व मूळ अर्जातील मागण्या सारख्या आहेत. हे खरे आहे की, घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा कायदा कलम १३ प्रमाणे अंतरिम आदेश करता येतो. परंतु याबाबत जरी सामनेवाला याने अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे नाकारलेले असले तरी त्यादृष्टीने याबाबत अभिलेखावर संरक्षण अधिकारी यांनी दाखल केलेल्या कौटूंबिक घटना अहवालाचे अवलोकन केले असता सकृतदर्शनी अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झाल्याचे दिसून येते. तसेच सामनेवाला याने जरी अर्जदारास नांदण्यास येण्यासाठी स्वत: तसेच मध्यस्थांमार्फत अनेक प्रयत्न केले परंतु अर्जदाराने नांदण्यास येण्यास स्पष्ट नकार दिला असुन ती स्वइच्छेने माहेरी रहात आहे असे कथन केलेले असले तरी अर्जदाराने स्वत: सामनेवालाचा त्याग केला किंवा कसे ही बाब दोन्ही बाजूचा पुरावा घेवून गुणवत्तेवर ठरविणे आवश्यक आहे. परंतु सकृतदर्शनी अर्जदार ही सामनेवालापासून स्वतंत्र रहात असून सामनेवालाने तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही काळजी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत आर्थिक लाभाचा आदेश करणे उचित होईल.

९) आर्थिक लाभाचा आदेश पोटगीच्या स्वरुपात करता येईल. अर्जदार व सामनेवाला क्र. १ एकत्र रहात नाहीत. अर्जदार तिच्या माहेरी रहात आहे. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाहसंबंध अद्याप कायम आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत अर्जदाराचा सांभाळ करण्याची नैतिक जबाबदारी सामनेवाला क्र.१ याची आहे. तसेच सामनेवाला क्र.१ याने त्याला वडिलोपार्जीत शेती असल्याचे नाकारलेले नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत सा.वाला क्र.१ यास उत्पन्नाचे साधन नाही असे म्हणता येणार नाही. अर्जदाराने अर्जासोबत सामनेवालाच्या जिपगाडी वाहनाचा फोटा दाखल केला असला तरी सदरचे वाहनाचे मालकीबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे अर्जात नमुद केलेली सामनेवाला क्र. १ यांचे उत्पन्नाबाबत देखील स्वतंत्र कागदोपत्री पुरावा पटलावर सादर केलेला नाही. याउलट, सामनेवाला याने देखील त्याचे म्हणण्यामध्ये अर्जदार ही नोकरी करत असून दरमहा रक्कम रु. १५ ते १६ हजार इतका पगार घेत असल्याचे कथन केलेले आहे. मात्र सामनेवाला याचे तोंडी कथनाशिवाय अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सामनेवाला याने याकामी दाखल केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत वर नमुद वस्तुस्थिती विचारात घेवून अर्जदाराच्या दैनंदिन गरजा तसेच राहणीमान पहाता सामनेवाला क्र.१ याने अर्जदारास दरमहा रुपये ३,०००/— या दराने प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी म्हणून मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल. अर्जदाराच्या इतर मागण्यांबाबतचा आदेश दोन्ही बाजूंचा पुरावा घेवून गुणदोषांवर केल्यास दोन्ही बाजूंना न्याय्य होईल व ऐकण्याची संधी मिळेल. यावरुन अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजूर होण्यास पात्र आहे. त्यासाठी पुढील आदेश करण्यात येतो.

## आदेश

१) प्रस्तुत अर्ज निशाणी ५ अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) सामनेवाला क्र. १ याने अर्जदारास दरमहा रक्कम रू.३,०००/— (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) या दराने अर्ज दाखल तारखेपासून अंतरिम पोटगी म्हणून मूळ अर्जाचा निकाल होईपर्यंत नियमितपणे दयावी.

३) आदेशाची प्रत सरंक्षण अधिकारी, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांना विनामूल्य देण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

दिनांक — २२.१०.२०२१ (पी. व्ही. सपकाळ)
जुन्नर जि पुणे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, जुन्नर